क्रमांक:एसडब्ल्यूएल-०४/२००१/प्र.क्र.३१०/फ-५
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २३/०६/२००६

प्रति,
प्रधान मुख्य वनसंरक्षक,
महाराष्ट्र राज्य, नागपूर

विषय:- प्लायवूड - विनियर आरागिरणी इत्यादि विषयासंबंधी
केंद्रिय उच्चाधिकार समितीने घेतलेल्या निर्णयाबाबत.
संदर्भ:- केंद्रियउच्चाधिकारसमितीचेपत्रक्र.२-७/सीईसी/एससी/
२००६- पीटी.३, दिनांक २० जून, २००६ पहावे.

केंद्रिय उच्चाधिकार समितीने दिनांक २०/०६/२००६ रोजी प्रधान सचिव (वने) व प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य यांच्या सोबत समितीच्या सदस्यांसह उपरोक्त विषयाबाबत बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले त्या निर्णयांचे इतिवृत्त केंद्रिय उच्चाधिकार समितीचे सदस्य सचिव यांनी उपरोक्त संदर्भात नमूद केलेल्या पत्राद्वारे निर्गमित केलेले आहे. सदर इतिवृत्तातील निर्णयाच्या अनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

२. राज्यामध्ये दिनांक ४/३/१९९७ रोजी व त्यापूर्वी ज्या विनियर प्लायवूड युनिटस मध्ये स्लायसर, पिलर, चिपर किंवा आरा मशीन या प्रकारच्या मशीनरी अस्तित्वात नव्हत्या व अशी युनीटस् दि. ४/३/१९९७ पूर्वीपासून चालू आहे आणि अशा युनीटमध्ये विनियर विशिष्ट आकारामध्ये कापण्यासाठी ट्रिमींग मशीनचा वापर केला जातो अशी युनीट चालू ठेवण्यास केंद्रिय उच्चाधिकार समितीने परवानगी दिलेली आहे. परंतु या प्रकारची युनीट राज्यामध्ये अस्तित्वात असल्याबाबतची परिक्षण क्षेत्रीय स्तरावर करणे आवश्यक असून असे परिक्षण करून युनीटची अचूक गणना करावी लागेल. क्षेत्रीय स्तरावर अशा प्रकारचे परिक्षण व गणना करतांना कनिष्ठ स्तरावरील कर्मचाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारची चूक केली जाऊ नये याची खबरदारी घेणे आवश्यक असल्यामुळे वृत्त स्तरावर तसेच जिल्हा स्तरावर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली परिक्षण पथकाची निर्मिती करावी व अशा पथकाकडून युनीटचे परिक्षण व गणना याची अचूक माहिती तयार करून शासनास दि. १४ जुलै २००६ पर्यंत सादर करावी.

6

३. इंडियन प्लायवूड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, मुंबई तसेच अथर्व विनीअर, नवी मुंबई या दोन प्लायवूड युनीट यांचे अर्ज सीईसीने वरील निर्णयाच्या अनुषंगाने निकाली काढलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या बाबतीत तात्काळ परिक्षण करुन ही युनीटे दि. ४/३/१९९७ पूर्वीपासून अस्तित्वात आहेत याची खात्री करुन सदर युनीट तात्काळ सुरु करण्यास सूचना देण्यात याव्यात. याबाबत कार्यवाई दि. ३० जुन, २००६ च्या आत करण्यात यावी.

४. राज्यामधील विनीअर व प्लायवूड युनीट यांचे परिक्षण व गणना करतांना काही युनीट अस्तित्वात असून सुध्दा गणतीमधून सुटण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यासाठी खबरदारीची उपाययोजना म्हणून प्रत्येक विभागामध्ये अशा युनीट अस्तित्वात असल्यास अशा युनीटच्या मालकांनी स्थानिक वनाधिका-यांकडे आपली माहिती सादर करावी अशा प्रकारच्या सूचना वर्तमानपत्रात जाहिरातीद्वारे देण्यात याव्यात.

५. केंद्रिय उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये असाही निर्णय घेण्यात आलेला आहे की राज्यामध्ये नविन आरा गिरणी परवाना देण्यासंबंधी विचार करावयाचा झाल्यास महाराष्ट्रात लाकडाचे उत्पन्न व अस्तित्वात असलेल्या आरा गिरण्या व इतर लाकूड आधारित उद्योग यांची क्षमता या दोन्ही गोष्टींचा आढावा घेणे आवश्यक आहे. समितीने अशा सूचना दिल्या आहेत की, याबाबत राज्याने लाकूड उत्पादन याबाबत पुन्हा आढावा घेण्यात यावा याबाबतची संख्या समितीद्वारे राज्यातील शासकीय वनातील व शासकीय वनाबाहेरील क्षेत्रातील व परराज्यातून आयात होणारे तसेच परदेशातून आयात होणारे लाकूड यांचा एकत्रितपणे आढावा घेण्यात यावा.

सही/- सुधा नारायण
२५-५-०६
( नीला सत्यनारायण )
प्रधान सचिव(वने)
महसूल व वन विभाग.

प्रतिलिपी,

(१) इंडिअन प्लायवूड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी प्रा.लि.
६१, घोरपदेव रोड नं.१, रे रोड, मुंबई- ४०० ०१०.
(२) अथर्व विनियर्स प्रा.लि., प्लॉट नं.आर-५११ एमआयडीसी एरोया,
नवी मुंबई - ४०० ७०१.